प्रस्तुतचा अर्ज वादीनी मयत प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे यांचेबाबत झालेला उपशमनचा (Abatement) आदेश रद्द करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या मते, दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.३ विजया अशोक तुंगारे या दिनांक २८.०६.२०२० रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांना अर्जातील नमुद केलेले वारस हेच नजिकचे व कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.३ यांचा मृत्यू दाखला, वारसांची नावे व पत्ते वेळीच उपलब्ध न झाल्याने तसेच वादी क्र.१, ३ ते ९ व ११ ते १४ करिता कुलअखत्यारी वादी क्र.१० हे सदर कालावधीमध्ये आजारी असल्या कारणाने सदर मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास १९८१ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब अर्ज.

**३.** प्रतिवादी क्र.११ ते १४ यांनी निशाणी क्र.११८ कडे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन तिव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे कथनाप्रमाणे, अर्जातील सर्व कथने खोटी व खोडसाळ असून, प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाहीत. वादींनी त्यांच्या आजारपणाबाबतचा कोणताही वैद्यकिय दाखला व विलंबाबाबतचे संयुक्तीक कारण नमूद करुन त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर केलेला नाही. त्यामुळे अर्ज कायद्याने चालणारा नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करुन तो खर्चासह फेटाळण्यात यावा. इतर प्रतिवादींनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणणे विना विचारात घेण्यात येत आहे.

**४.** अर्ज म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुतचा दावा हा धडेवाटप वाटप होवून मिळणेकरीता दाखल आहे. प्रतिवादी क्र.३ या दिनांक २८.०६.२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. तेव्हापासून ९० दिवसांच्या कायदीय कालावधीमध्ये त्याचे वारस अभिलेखावर आणलेले नाहीत. त्यामुळे तांत्रीक दृष्ट्या सदर

प्रतिवादीविरुध्द दावा उपशमित झाला आहे. त्यानंतर उपशमन रद्द होणसाठी देखील ६० दिवसांचा विहीत मुदतीमध्ये अर्ज दाखल नाही. प्रस्तुत अर्ज दि.२८.०२.२०२६ रोजी दाखल आहे. म्हणजेच ५ वर्षे, ३ महिन्यांच्या विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला असल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादीने त्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. वादी हा प्रतिवादी क्र.३ यांचा मृत्यू दाखला, वारसांची नावे व पत्ते वेळीच उपलब्ध न झाल्याने तसेच वादी क्र.१, ३ ते ९ व ११ ते १४ करिता कुलअखत्यारी वादी क्र.१० हे सदर कालावधीमध्ये आजारी असल्या कारणाने विलंब झाल्याचे नमुद करीत आहे. परंतु, एकुण झालेला विलंब पाहता, सदरचे कारण स्विकारता येणार नाही. असे असले तरी दाव्याचे स्वरूप विचारात घेता मयत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा सुरु ठेवण्याचा हक्क टिकून राहतो (Right to survive). त्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेसाठी मयत प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. तसेच वादीने केलेल्या विलंबाबत त्यांचेवर काही खर्च देखील लादणे गरजेचे आहे. सबब, खालीलप्रामणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.३ यांचेबाबत झालेला उपशमन (Abatement) चा आदेश रद्द करणेस झालेला विलंब रक्कम रुपये १,२००/- (रुपये एक हजार दोनशे मात्र) खर्चास अधिन राहून माफ करण्यात येत आहे.

३. वादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी क्र.११ ते १४ यांना एकत्रात देवून दाव्याच्या सरनाम्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

SHIVAJI PANDURANG PATIL

Digitally signed by SHIVAJI PANDURANG PATIL
Date: 2026.07.03 17:32:20 +0530

दिनांकः -०३/०७/२०२६ (एस.पी.पाटील)

ठिकाणः- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी